आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१३ मे २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानाला शांततेत प्रारंभ/ सकाळी ११ वाजेपर्यंत सुमारे २४ टक्के मतदान झाल्याचा अंदाज
- महाराष्ट्रातल्या ११ मतदारसंघात ११ वाजेपर्यंत सुमारे १७ टक्के मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क
- पाचव्या आणि पुढच्या टप्प्यातल्या प्रचारासाठी राजकीय नेत्यांचे झंझावाती दौरे
- सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल जाहीर
- आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्समधे अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर रंगणार

**आणि**

- पुढचे काही दिवस द्वीपकल्पीय प्रदेशात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान आज सकाळी ७ वाजल्यापासून सुरु झालं. नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या ९६ जागांसाठी आज हे मतदान होत आहे. आंध्र प्रदेशातल्या सर्व २५ जागा, तेलंगणातल्या सर्व १७ जागा, उत्तर प्रदेशात १३, महाराष्ट्रात ११, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधे प्रत्येकी आठ, तर बिहारमधे ५ जागांवर आज मतदान होत आहे. झारखंड आणि ओडिशातल्या प्रत्येकी ४ आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या एका मतदारसंघाचाही या टप्प्यात समावेश आहे.

सकाळी ११ वाजेपर्यंत सुमारे २४ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. झालेल्या **मतदानाची राज्यनिहाय आकडेवारी अशी आहे-**

पश्चिम बंगालमधे ३३ टक्के, मध्य प्रदेशात ३२ टक्के, उत्तरप्रदेश आणि झारखंडमधे प्रत्येकी २७ टक्के, बिहारमधे २२ टक्के तर महाराष्ट्रात १७ टक्के मतदान झालं. आंध्र प्रदेशात २३ टक्के, तेलंगणात २४ टक्के तर ओदिशात २३ टक्के मतदारांनी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केलं. जम्मू काश्मीरच्या एका मतदारसंघात आज मतदान होत असून तिथे ११ वाजेपर्यंत सुमारे १५ टक्के मतदारांनी मतदानाचं कर्तव्य पार पाडलं.

मतदान सकाळी ७ वाजता सुरू झालं असून ते संध्याकाळी ६ वाजता संपेल. मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी तेलंगणातील १७ मतदारसंघात काही ठिकाणी मतदानाची वेळ वाढवण्यात आल्याचं आयोगानं म्हटलं आहे. या टप्प्यात ८ कोटी ९७ लाख पुरुष आणि ८ कोटी ७३ लाख महिला मतदारांसह एकंदर १७ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार मतदानासाठी पात्र आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या आजच्या चौथ्या टप्प्यासाठी एकूण १ हजार ७१७ उमेदवार रिंगणात असून अनेक प्रमुख उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये बंद केलं जाईल. यामध्ये केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते गिरिराज सिंह, अर्जुन मुंडा, जी किशन रेड्डी, अजय कुमार मिश्रा; जेडीयूचे राजीव रंजन सिंह; समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव; काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी; टीएमसीच्या महुआ मोईत्रा आणि शत्रुघ्न सिन्हा आणि एआय-एमआयएम चे असदुद्दीन ओवेसी या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीड या ११ मतदारसंघात मतदार आज आपला हक्क बजावत आहेत. सकाळी ११ वाजेपर्यंत राज्यात १७ टक्क्यांहून जास्त मतदारांनी मतदान केलं.

**मतदारसंघ निहाय मतदानाची टक्केवारी याप्रमाणे आहे. -**

नंदुरबार - २२ पूर्णांक १२ शतांश टक्के, जळगाव- १६ पूर्णांक ८९ शतांश टक्के रावेर - १९ पूर्णांक ३ शतांश टक्के, जालना - २१ पूर्णांक ३५ शतांश टक्के, औरंगाबाद - १९ पूर्णांक ५३ शतांश टक्के, मावळ - १४ पूर्णांक ८७ शतांश टक्के, पुणे - १६ पूर्णांक १६ शतांश टक्के, शिरूर - १४ पूर्णांक ५१ शतांश टक्के, अहमदनगर - १४ पूर्णांक ७४ शतांश टक्के, शिर्डी -१८ पूर्णांक ९१ शतांश टक्के, बीड - १६ पूर्णांक ६२ शतांश टक्के

**<><><><><>**

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी सहकुटुंब मतदान केलं. तर याच मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे आणि महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनीही मतदानाचा अधिकार बजावला. केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भोकरदनमध्ये, राज्यातले मंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगावमध्ये, मंत्री विजयकुमार गावित आणि नंदुरबारच्या महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांनी नंदुरबारमध्ये मतदान केलं. माजी मंत्री के. सी. पाडवी आणि महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांनीही मतदानाचा हक्क बजावला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी अहमदनगरमध्ये मतदान केलं.

**<><><><><>**

आंध्र प्रदेश आणि ओदिशा विधानसभा निवडणुकांसाठी ही आज मतदान होतं आहे. दोन्ही राज्यांमधे सकाळी ११ वाजेपर्यंत २३ टक्क्यांहून जास्त मतदान झालं आहे.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'वायव्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज धुळे आणि पालघर जिल्ह्यांत प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. भाजपा उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ धुळ्यात तर हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ पालघरमध्ये ते सभा घेणार आहेत.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुंबईत सभा घेतल्या.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमध्ये हाजीपूरमध्ये प्रचारसभेला संबोधित केलं. देशाच्या विकासासाठी मतदान करण्याचं आवाहन त्यांनी जनतेला केलं. प्रधानमंत्री मोदी चिराग पासवान यांच्यासह मुझफ्फरपूर आणि छपराच्या उमेदवारांचा प्रचार करणार आहेत. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं ते आज संध्याकाळी रोड शो करणार आहेत. प्रधानमंत्री मोदी उद्या वाराणसी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे झारखंडमध्ये दोन निवडणूक सभांना संबोधित करणार आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी उत्तर प्रदेशात रायबरेली इथं प्रचारसभेला संबोधित करणार आहेत.

<><><><><>

काँग्रेसने विकासाला कधीच प्राधान्य दिलं नाही उलट मतपेढीकडे लक्ष ठेऊन संतुष्टीकरणाचं धोरण अवलंबल असल्याची टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. भाजपाच्या विकासभिमुख कारभारामुळे ज्या राज्यांना पूर्वी बिमारु राज्यं म्हटलं जायचं त्या राज्यांची भरभराट होतं असल्याचं ते म्हणाले. इंडिया आघाडीला गरजू लोकांकडून आरक्षण काढून घेऊन ते विशिष्ट समुदायाला द्यायचं असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपाला संपूर्ण देशातून पाठिंबा मिळत असल्याचं त्यांनी एका खाजगी दूरचित्रवाहिनीला दिलेल्या दुसऱ्या मुलाखतीत म्हटलं आहे.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे बारावीचे निकाल आज जाहीर झाले. या परीक्षेला बसलेले ८७ पूर्णांक ९८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचं प्रमाण गेल्या वर्षापेक्षा ६५ शतांश टक्क्यांनी वाढल्याचं सीबीएसईनं सांगितलं आहे. चोवीस हजार विद्यार्थ्यांनी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त तर एक लाख सोळा हजार विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

<><><><><>

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्सचा सामना होणार आहे. अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं दिल्ली कॅपिटल्सचा ४७ धावांनी पराभव करत प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवल्या. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीनं निर्धारित २० षटकात ९ गडी गमावून १८७ धावा केल्या.

या स्पर्धेतल्या दुसऱ्या सामन्यात काल चेन्नई सुपर किंग्जनं राजस्थान रॉयल्सवर कमी धावसंख्येच्या जोरावर पाच गडी राखून विजय मिळवला.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं पुढील तीन ते चार दिवस पूर्व, मध्य आणि दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशात वादळ आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. तसंच येत्या गुरुवार पासून राजस्थानसह वायव्य भारतात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये उद्यापर्यंत वादळे, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेश आणि दक्षिण राजस्थानच्या मैदानी भागात आज धुळीचं वादळ येण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर ताशी ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे. सौराष्ट्र आणि कच्छमध्ये पुढचे पाच दिवस उष्ण आणि दमट हवामान कायम राहील.

दरम्यान, दिल्लीत आज हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत राहील. तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि उत्तर आंध्र प्रदेशात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तमिळनाडू आणि केरळसह आग्नेय द्वीपकल्पीय प्रदेशात काही भागांमध्ये मुसळधार पाऊस आणि गडगडाटी वादळे येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

इंडोनेशियाच्या पश्चिम सुमात्रा प्रांतात मुसळधार पावसामुळे पूर आणि भूस्खलन होऊन किमान २८ जणांचा मृत्यू झाला असून ४ जण अजूनही बेपत्ता आहेत. या आपत्तीमुळे प्रभावित झाले असून रस्त्यावरील वाहतूक

**//<><><><><>//**